अश्लीलता हा कोणत्याही लेखाचा, चित्राचा किंवा इतर वस्तूचा गुण नसून तो फक्त तसा आरोप करणाराच्या मनाचा गुण होय.

# नगरचें साहित्यसंमेलन

संमेलनाहून आल्यानंतर आमच्या विशेष लक्षांत राहिल्या अशा गोष्टी म्हणजे प्रवासांतील हाल आणि नगर येथील उत्तम व्यवस्था. झोन तिकिटांनी कोणाची सोय झाली असेल ती असो, परंतु आमचे मतें तर झोन तिकिटें म्हणजे सर्व गाड्यांत अतोनात गर्दी ( अर्थात् वरच्या वर्गांतून जाणारांना झोन बाधत नाही ) आणि खाण्यापिण्याचे हाल. गर्दी इतकी कीं स्टेशनांवर खाण्यापिण्याचे पदार्थ भरपूर असले तरी ते मिळणें अशक्य, कारण जाग्यावरून हालायला जागा नाही, आणि इतकेंहि करून हाललेंच तर जागा गेल्यामुळें उभें राहण्याचा प्रसंग ! त्यापेक्षा आम्ही उपासच पत्करला. मनमाडचे स्टेशनावर कांही खाऊं असें ठरवलें होतें, परंतु तेथे गाडीला किंचित् उशीर झाल्यामुळे दुसऱ्या गाडींत लवकर जाऊन बसावें लागलें, आणि एका धक्क्याच्या दोन्ही बाजूंना दोन गाड्या भरलेल्या उभ्या असतांहि तेथे कोणीहि कांही खाद्यपेय विकीत नव्हता, व पुढे नगरपर्यंत पाणीहि मिळण्याची मारामार ! बरोबरचे कांही लोकांनी एका स्टेशनावर तळलेली डाळ घेतली, ती खाल्ल्यावर पाणी नाही म्हणून जीव कासाविस झाला. परत येतांना थेट नगरपासून मुंबईला जाणारे डबे असतात, परंतु आमचा डबा दौंडला सोडल्यामुळे तो बदलावा लागला, आणि नंतर नवीन डबा पुण्याला सोडल्यामुळें पुढे त्या गाडींत जागा मिळाली नाही आणि जवळजवळ दोन तास धक्क्यावर बसून काढून पुढच्या गाडीने जावें लागलें. या गाडींतहि अतोनात गर्दी होती आणि कांहीं लोकांना मुंबईपर्यंत सात तास उभे रहावें लागलें. झोन

तिकिटें काढून जनतेवर उपकार केल्याचा आव जरी रेल्वे कंपनीनें आणला, तरी शहाण्या माणसाने या दिवसांत प्रवास न करणेंच बरें, कारण हीं तिकिटें केवळ शक्य तितका जास्त नफा काढण्याकरतांच केलीं असल्यामुळे कंपनी जरूर तितक्या जास्त गाड्या सोडीत नाही, आणि उतारूंची सोयीपेक्षा गैरसोयच जास्त होते.

नगरच्या स्वागतमंडळाने मात्र शक्य तितकी उत्तम व्यवस्था ठेवली होती आणि जेवणहि चांगलें होतें. अर्थात् स्नानाच्या खोल्यांना दरवाजे नसल्यामुळे विजारी घालणारांना स्नानाची सोय दुसरीकडे पहावी लागली, तथापि याबद्दल स्वागतमंडळाला दोष देतां येत नाही. विशेष सांगण्यासारखी गोष्ट म्हणजे नगरला सामान्यतः उसाच्या रसासारखें दिसणारें पाणी सर्वांना प्यावें लागतें, परंतु प्रतिनिधिनिवासांत मात्र पिण्याकरतां पारदर्शक पाणी विपुल पुरवण्याची व्यवस्था केली होती.

संमेलनाचे अध्यक्ष श्री. द. वा. पोतदार यांचेंहि काम वाखाणण्यासारखें झालें. असा अध्यक्ष संमेलनाला कधीच लाभला नव्हता असें अनुभवी लोक म्हणतात. मुंबईच्या स्वागतमंडळाप्रमाणेंच नगरच्या मंडळानेहि दडपशाही करून कांहीं महत्त्वाचे ठराव विषयसमितीपुढे येऊंच नयेत अशी व्यवस्था आपल्याकडून केली होती, परंतु त्यांनी दडपलेले ठराव देखील अध्यक्षांनी पुढे येऊं दिले आणि कोणालाहि अन्याय होऊं न देण्याकरितां त्यांनी जी दक्षता दाखविली, तीमुळेच सर्व पक्षांचे लोक अध्यक्षांवर खुष झालेले दिसले व त्यांच्या चिडखोरपणाचेंहि कोणाला फारसें वैषम्य वाटलें नाहीं. वास्तविक असा अधिकारच स्वागतमंडळाला असतां नये. पोतदारांना अध्यक्ष केल्यामुळें त्यांच्या पहिल्या व शेवटच्या भाषणांपलीकडे त्यांना भाषण करण्याची संधि मिळाली नाही हें एक बरें झालें असें कांहींचें म्हणणें होतें, तरीपण एकंदरींत त्यांच्या निःपक्षपाताबद्दल त्यांची तारीफच विशेष ऐकूं येत होती.

संमेलनांत रणें माजलीं मुख्यतः दोन ठरावांवर. एक युद्धविरोधी ठराव आणि दुसरा सक्तीच्या हिंदी शिक्षणाविरुद्ध ठराव. तथापि साम्राज्यशाही युद्धांत

हिंदुस्थानाने सामील होऊं नये हा ठराव बहुमताने पसार झाला. हिंदी शिक्षणासंबंधी बराच मतभेद होता, आणि तात्विक दृष्ट्या सक्तीचें तत्व आम्हासही मान्य नाही, परंतु शिक्षणाचे बाबतींत मुलांवर नेहमीच सक्ती होत असते, आणि त्यांच्या मताला कोणीच भीक घालीत नाही. मुख्य प्रश्न आईबापांना हिंदी पाहिजे आहे की नाही हा होता, आणि हिंदी इष्ट आहे हें कबूल केल्यास तोही प्रश्न रहात नाही. वास्तविक इतर सक्तीच्या विषयांसंबंधी तरी आईबापांचें मत कधी कोणीं घेतलें होतें ? शिवाय हिंदीची सक्ती फक्त पहिल्या तीन इंग्रजी यत्तांत करण्याचें घाटत आहे व यांत विद्यार्थ्यांवर विशेष बोजा पडतो असें वाटत नाही. चौथ्या वर्षापासून संस्कृत किंवा इतर भाषा शिकाव्या लागतात, त्याचे अगोदरच हिंदी होऊन जाईल.

अश्लीलतेचे प्रोफेसर कृष्णराव मराठे हे यंदा पावित्र्यविडंबनाचा ठराव घेऊन आले होते. हा ठराव साहित्यपरिषदेकडून यावा असें त्यांचें म्हणणें होतें, परंतु त्या सभेचे अध्यक्ष श्री. न. चिं. केळकर यांनीच त्याला विरोध केला. विडंबन करणारांवर खुशाल खटले करावे अशी एक प्रतिगामी सूचना त्यांनी दिलीच, परंतु ठराव पडला. श्री. केळकर आले होते मुख्यतः आपलें परिषदेचें अध्यक्षपद कायम राखण्यासाठी. कारण श्री. मामा वरेरकरांचा ठराव पसार झाला असता तर संमेलनाचे अध्यक्ष हेच परिषदेचे अध्यक्ष झाले असते. परंतु श्री. पोतदार व मी असे दोघेहि परिषदेच्या कार्याकरतां दौरा काढूं, पण हा ठराव परत घ्या, अशी विनंति श्री. केळकरांनी केल्यावरून मामांनी तो परत घेतला. एवढें काम झाल्यावर श्री. केळकर संमेलनाकरतां थांबले नाहीत. परिषदेने धुडकावलेला ठराव श्री. मराठ्यांनी विषयसमितीपुढे मांडला, आणि त्यांनी अनेक उपसूचना कबूल केल्यामुळे अर्थहीन झालेला तो ठराव संमेलनापुढे आला आणि पुढे बारा वर्षेपर्यंत संमेलनाला त्रास न देण्याचें त्यांनी कबूल केल्यामुळे त्या ठरावाला कायमची मूठमाती देण्याकरतां तो बिनविरोध मंजूर केला. या ठरावाचा अर्थ मला स्वतःला समजत नाही असें खुद्द अध्यक्षांनी विषयसमितींत सांगितलें, तेव्हा त्याप्रमाणे वागणें अशक्यच आहे.

'किर्लोस्कर' चे संपादक श्री. शंकरराव किर्लोस्कर हे 'साहित्यचित्रकला' शाखेचे अध्यक्ष असल्यामुळे आपल्या नववधूसह तेथे उपस्थित झाले होते व त्यांनी आपलें अध्यक्षीय भाषण छापलेला कागद हातीं न घेतां बिनचूक म्हणून दाखवलें, हा एक स्मरणशक्तीचा चमत्कार पहाण्यासारखा होता. हे महाशय स्वतःला पुरोगामी समजत असल्यामुळे मामा वरेरकरांनी त्यांना सहज प्रश्न केला की आपण मुंबईच्या पुरोगामीलेखकपरिषदेला कां आलां नाही ? यावर ते उत्तरले, 'मुंबईला खरोखरच कोणी पुरोगामी लेखक आहेत की काय याची मला शंका असल्यामुळे मी आलों नाही.' अर्थात् खेडवळ संपादकांना साजेसेंच हें उत्तर होतें. '**निरस्तपादपे देशे एरंडोऽपि द्रुमायते।**'

संमेलनाच्या अध्यक्षांचें, स्वागताध्यक्षांचें वगैरे भाषणें छापून श्रोत्यांस वांटण्याची पद्धत आहेच. या वर्षीं 'महाराष्ट्र–परिचय' मासिकाचा खास अंक संमेलनाचे वेळीं काढून त्यांतच या सर्व भाषणांचा समावेश केला होता...हीं भाषणें छापून वांटल्यानंतर तीं पुनः वाचून किंवा पाठ म्हणून दाखवण्यांत विनाकारण वेळ जातो आणि इतर बाबतींत त्यामुळे काटछाट करावी लागते. तेव्हा हीं भाषणें प्रत्यक्ष न करतां तीं केलीं असें समजावें, अशी पद्धत अंमलांत आणणें जरूर आहे. अर्थात छापील भाषणांना थोडी पुस्ती जोडणें असल्यास जोडावी, परंतु भाषणें वाचूं नये हें इष्ट दिसतें.

———:०:———

आमचे मासिकाच्या गेल्या सप्टंबरच्या अंकांतील 'कामकला' या पुस्तकाची जाहिरात अश्लील असल्याच्या आरोपावरून आम्हास एप्रिलचे ५ तारखेला अटक करून जामिनावर सोडलें होतें; ६ तारखेला कोर्टांत हजर करून १८ तारीख नेमली, १८ तारखेला पुनः मेचे २ तारखेपर्यंत खटला लांबणीवर टाकला, आणि २ मेला पुनः जून ६ पर्यंत लांबणीवर टाकला.

# चांगला धंदा !

——:*:——

' गी द मोपसां ' वरून

तो म्हणजे तसा कांही मोठा संत नव्हता आणि तो आपल्या सद्गुणां बद्दल विशेष बढाईहि मारीत नसे, पण आपण इतर दहा माणसांपेक्षा कांही वाईट नाही, किंबहुना तसें पाहिलें तर थोडे चांगलेच आहों, असें मात्र त्याला वाटत असे. हें त्याचें अगदी निःपक्षपाती मत होतें, आणि या मताला कोणी घमेंड म्हणेल अशी कल्पनाहि त्याला आली नसती. आपली खरी किंमत तो जाणून होता इतकेंच, त्यांत घमेंड कसली ? त्याचीं तत्वें उच्च होतीं, आणि तो तीं इतरांच्या वागणुकीलाच लावीत असे असें नाही,: स्वतःची वागणूकहि त्या तत्वांबरहुकूम ठेवण्याचा प्रयत्न तो करीत असे. आपण अगदी संभावीत गृहस्थ आहोंत असें जर त्याला प्रामाणिकपणें म्हणतां आलें नसतें, तर त्याला वाईट वाटलें असतें. स्वतःसंबंधीचें हें उत्तम मत बदलण्याचा प्रसंग त्याला कधीच आला नव्हता आणि याबद्दल त्याला अत्यंत समाधान वाटत असे.

या समाधानी वृत्तींत एखाद्या मानसशास्त्रज्ञाला कदाचित् कांही दोष दिसला असता. उदाहरणार्थ इतरांच्या दुर्गुणांचा किंवा संकटाचा फायदा घेऊन त्यांतून नफा काढण्यांत त्याला कांहीच चूक वाटत नसे, मात्र या दुर्गुणांबद्दल किंवा संकटाबद्दल आपणच सर्वस्वी जबाबदार असतां नये, इतकेंच तो पहात असे. याबद्दल कोणी वाद करूं लागला तर तो थोडासा रागावून म्हणत असे, 'तुम्ही छिद्रान्वेषी लोक आहांत. माझी वागणूक इतकी सरळ असून सुद्धां तुम्ही असें म्हणतां, तेव्हा काय म्हणावें ?'

आणि खरोखरच त्याच्या कल्पना फार उदात्त होत्या. त्याला अप्रामाणिक म्हणणारावर तो संतापला असता खरा, पण त्याला कोणी अरसिक म्हटल्याने त्याला अधिक वाईट वाटलें असतें. प्रेमाच्या बाबतींत पाहिलें तर त्याला व्यभिचाराची मोठी चीड असे. कारण व्यभिचार करणाराला छातीठो-

कपणें कधीच म्हणतां येत नाही की मीं कोणाचें कांही वांकडें केलें नाही. आणि हें म्हणतां यावें हें तर त्याचें ध्येय होतें.

बरें पैसे मोजून विकत घेतलेलें प्रेमहि त्याला पसंत नव्हतें, कारण हृदयाच्या उच्च आकांक्षा म्हणजे कांही शारीरिक गरज नव्हे. यापेक्षा कांहीतरी काव्यमय असें त्याला पाहिजे होतें; आणि तें मिळायला त्याला कांहीं मोठेंसें कठिण जात असे असें नाही. अर्थात वेश्यागृहें त्याला वर्ज्य होतीं, आणि उघड धंदा करणाऱ्या बायांकडे तो ढुंकूनहि पहात नसे. पण पोषाख, रुबाब वगैरे सर्व बाजूंनी सभ्य दिसणारी कोणी स्त्री दिसल्यास तिच्याशीं थोडी ओळख करून घ्यावी,जमल्यास थोडी लगट करावी,आणि ती कबूल झाल्यास तिचें आपल्यावर एकदम प्रेम बसलें असें मानावें, हें काव्यच नव्हे का ? तेथपर्यंत ती अगदी निर्मळ आणि पवित्र नव्हती, असें तरी कोणीं सांगितलें आहे ? किंवा एखादी संकटांत सांपडलेली विधवा असेल, किंवा कदाचित् एखादी उच्च घराण्यांतली स्त्री आपल्यावर फिदा होऊन वेष बदलून आली नसेल कशावरून ?

मनाची अशी वृत्ति असल्यावर कपड्याच्या दुकानांत भेटणाऱ्या किंवा खिडकींतून हळूच खालीं पाहून खूण करणाऱ्या स्त्रियांकडे त्याचें लक्ष जाणें साहजिक होतें. खिडकी किंचित् किलकिली करून कोणी हांक मारल्यास त्याच्या मनांत येई, 'कोण असेल बरें ? तरुण आणि सुंदर? पण तोंड कां दाखवीत नाही ? म्हातारी असल्यामुळे भिते, की नवशिकी म्हणून? वर जाऊन पाहूं तर या. धाडस केल्याशिवाय आपल्याला पाहिजे तशी वस्तु कशी मिळणार ? ' आणि जिना चढतांना खरोखरच त्याची छाती धडधड करीत असे. जणूं काय प्रेमळ नवयुवतीची प्रथम भेट !

असें करतां करतां बरेच दिवस त्याची निराशाच होत असे, पण एके दिवशीं मात्र एका स्त्रीने तिसऱ्या मजल्यावरून त्याला बोलावलें; आणि आतां मात्र आपलें धाडस सफळ होणार असें त्याला मनांत वाटूं लागलें. वर जातांना त्याला कसला तरी वास येत होता, पण कसला हें त्याला चटकन ठरवतां येईना. जिना चढून झाल्याबरोबर समोरच्या खोलीचें दार उघडलें, आणि ती

म्हणाली ' आंत या ना ! ' आंतून फारच दर्प आला तेव्हा त्याने ओळखलें, ' कारबॉलिक् ॲसिदचा वास. ' ' हो, मग ? तुम्हाला आवडत नाही वाटतें ? रोगराईची भीति नाहीं. '

ती कुरूप नव्हती, पण तरुणहि नव्हती. तिचे डोळे सुंदर होते, पण खोल होते आणि ती नुकतीच रडली असावी असे दिसत होते. तथापि तिच्या चेहऱ्यावर स्मित होतें. त्यानें एकदम ठरवलें ' ही विधवा आहे आणि गरीबीमुळे तिला देहविक्रय करावा लागतो आहे. ' ती खोली स्वच्छ होती आणि सर्वत्र टापटीप दिसत होती, यामुळे त्याच्या तर्काला अधिक जोर आला. त्या गाळ्यांत एकामागें एक अशा तीन खोल्या होत्या. प्रथम निजण्याची खोली, नंतर बसायची खोली, आणि सर्वांत मागें स्वयंपाकघर. चुलीवर कांहीतरी शिजत होतें, आणि या खोलींत तर खूपच वास येत होता. तो हंसून म्हणाला, ' तुम्ही काय आमटींत कारबॉलिक ॲसिद घालतां की काय ? ' पलीकडे आणखी एक दरवाजा दिसला, तो तो उघडूं लागला तेव्हा मात्र ती ओरडली, 'छे, छे ! तिकडे जाऊं नका. '

' पण कां ? ' आतां तर त्याला अधिकच आंत जावेंसें वाटूं लागलें.

'कारण आंत गेलांत तरमग तुम्ही येथे राहणार नाही, आणि तुम्ही रहावें अशी माझी फार इच्छा आंहे. आतां काय सांगूं ? '

' मग तर पाहिलेंच पाहिजे, ' असें म्हणून त्यांने तो दरवाजा जोराने उघडला. आंतून कॉरबालिक ॲसिदचा अधिकच वास आला, आणि तेथे एका लोखंडी पलंगावर एका स्त्रीचें प्रेत ठेवलें होतें तें पाहून तो घाबरलाच, आणि पळून जाऊं लागला.

पण ती त्याला जाऊं देईना. त्याचा हात घट्ट धरून ठेवून ती त्याला रडत रडत सांगूं लागली, ' ही माझी मैत्रीण दोन दिवसांपूर्वी मेली आणि प्रेताची व्यवस्था करायला मजजवळ पैसे नाहीत. ती माझी जिवाची मैत्रीण, तेव्हा तिची चांगली व्यवस्था केली पाहिजे. मला फक्त दहा फ्रँक आतां पाहिजे

आहेत. निघून जाऊं नका. थांबा ना !' ती बाहेरच्या निजण्याच्या खोलींत आली होती, आणि तिने त्याचा हात पकडून ठेवला होता.

तो म्हणाला, 'हें पहा, मला जाऊं द्या. तुम्हाला मी दहा फ्रँक देतों, पण मी राहणें शक्य नाही.' असें म्हणून त्याने खिशांतून दहा फ्रँकची नोट काढून तिच्या हातांत दिली आणि तो जायला निघाला. पण दरवाजापर्यंत पोंचतो तों त्याच्या डोक्यांत एक विचार आला, 'आतां दहा फ्रँक तर दिलेच, पण ते फुकट कां द्यावेत ? ती तर कांही फुकट मागत नव्हती, आणि हें सगळें मला माहीत नसतें तर मी राहिलोंच असतों की नाही ? मग आतां रहायला काय हरकत आहे ?'

पुनः त्याच्या मनांत आलें, 'ती तिची मैत्रीण होती. ही काय मैत्री, की प्रेम ? प्रेमच, पण अनैसर्गिक प्रेम ! त्याची कशाला आपल्याला फिकीर करायला पाहिजे ? उलट हिचें प्रेम आपल्याला मिळालें तर त्या अनैसर्गिक प्रेमावर मात केल्यासारखें नाही का होणार ? जरूर होईल.'

तो तिच्याकडे वळून म्हणाला, 'हें पहा, मी दहाच्या ऐवजी वीस फ्रँक दिले, तर तिच्या प्रेतावर घालायला फुलें पण घेतां येतील, नाही ?'

तिचा चेहरा आनंदाने फुलला. 'काय ? खरेंच देतां वीस फ्रँक ?'

'हो, हे घे. आणखी सुद्धां देईन, पण तें तुझ्यावर अवलंबून आहे.'

---

# विवाहसंस्था

—:o:—

**लेआँ ब्लूम्** हे मध्यंतरीं फ्रान्सचे मुख्य प्रधान झाल्यामुळे त्यांच्या विवाहसंस्थेवरील ग्रंथाला बरीच प्रसिद्धि मिळाली, परंतु वस्तुतः हा ग्रंथ बराच जुना आहे. त्यांतील सारांश खालीं दिला आहे. त्यांतील कांहीं भाग चमत्कारिक वाटल्यास तो फ्रान्समधील परिस्थितीला उद्देशून लिहिलेला आहे हें लक्षांत घ्यावें:—

# विवाहसंस्था

जुन्या काळचीं आईबापांनी जुळवलेलीं लग्नें एका परीनें बरीं म्हणावीं लागतात, कारण त्यांत वधूवरांचा एकमेकांविषयी गैरसमज असणें शक्य नव्हतें. एकमेकांविषयी अज्ञान असे, पण गैरसमजापेक्षा अज्ञान बरें. गैरसमज दूर झाल्यानें जसा धक्का बसतो, तसा अज्ञान दूर झाल्यानें बसत नाही.

हल्लीची स्थिति अगदी निराळी आहे. हल्ली मुली उपवर झाल्यापासून विवाह होईपर्यंत जो काळ मधें जातो, त्यांत त्यांचे कामवासनेला योग्य वाव मिळत नाही, आणि ती दाबावी लागल्यामुळे पुष्कळ मुलींच्या डोक्यांत स्वतः-विषयीं भलत्याच कल्पना शिरतात, आणि त्या स्वतःची किंमत फाजील मानूं लागतात. आपल्या शरीराचा कोणा पुरुषाला उपभोग घेऊं देण्यांत आपण त्याच्यावर मोठा उपकार करतों अशी त्यांची कल्पना होते, आणि अशा स्थितींत त्यांना योग्य वर दिसतच नाहीसा होतो. इतकेंच नव्हे तर विवाहाच्या दृष्टीनें वरामधें कोणते गुण असावे, हें देखील त्यांना समजत नाहीसें होतें. संभोगलालसा असणें हा त्या कमीपणा समजूं लागतात. पण वास्तविक आपली स्वतःची मनः-स्थितिच विकृत कामवासनेची द्योतक आहे हें त्यांना कळत नाही. अशी त्यांची स्थिति कां होते हें पाहिलें पाहिजे.

या स्थितीचें कारण म्हणजे मुलगी वयांत आल्यापासून विवाह होईपर्यंत मधें जो काल जातो, तो हल्ली वाढत चालला आहे आणि या कालांत त्यांना नैसर्गिक कामवासनेशीं एकसारखा झगडा करावा लागतो. त्यांनी विवाहपूर्व समागमाचें धैर्य केलेंच तर तें उघडकीस येण्याचा संभव असतो, आणि तसें झाल्यास त्यांचा भयंकर छळ होतो. कारण विवाह एवढा एकच कामवासनेला शमवण्याचा मार्ग समाजाला पसंत आहे, आणि शिवाय एखादा मनुष्य पति होण्याला योग्य सांपडलाच, तरी तो प्रेमी होण्याला योग्य असतोच असें नाही. यामुळें एकतर त्यांना आपली आवडनिवड बाजूला ठेवून लग्न करावें लागतें, किंवा इतर विचार बाजूला ठेवून आवडीलाच महत्व द्यावें लागतें, किंवा कौमार्य पाळावें लागतें. आणि हें कौमार्य जितका अधिक काल पाळावें, तितकी त्यांची निवड करण्याची शक्तिही कमी होते.

पण निसर्ग आणि चालू नीति यांचा असा उभा दावा कां ? याचें कारण स्पष्टपणें समजायला बरेंच डोकें खाजवावें लागतें. ज्या काळांत स्त्रियांना गुरांप्रमाणें विकण्याची आणि विकत घेण्याची प्रथा होती, तेव्हा अर्थातच गुलामांच्या बाजारासारखीच स्थिति होती. म्हणजे जो गुलाम थोडेंबहुत काम करून थकला आहे, त्यापेक्षा जशी ताज्या दमाच्या गुलामाला जास्त किंमत येत असे, तशीच वापरलेल्या स्त्रीपेक्षा कुमारीला जास्त किंमत येत असे. त्यानंतर ख्रिस्ती नीतीचा अंमल सुरू झाला, आणि त्यांत समागम हेंच पाप मानलेलें आहे आणि विवाहविधि एवढीच त्या पापांतून सुटका आहे. पण त्या पद्धतींत अविवाहित मुलींवर जेवढी करडी नजर असते, तेवढी विवाहित स्त्रियांवर नसते. वस्तुतः विवाहित स्त्रीनें व्यभिचार करणें म्हणजे विवाहप्रसंगीं दिलेलें वचन मोडणें होय, तसें कुमारीच्या बाबतींत नसतें. तेव्हा व्यभिचारच अधिक पाप मानलें पाहिजे, परंतु ख्रिस्ती नीतींत तसें मानीत नाहीत.

अर्थातच कोणीही समंजस मनुष्य असें म्हणेल की हल्ली स्त्रियांना विकीतही नाहीत आणि ख्रिस्ती धर्माचें माहात्म्यही पुष्कळ कमी झाले आहे. मग अजून अशी स्थिति कां असावी ? कौमार्याला इतकी किंमत कां ? यांत अर्थातच मुलीचें हित नाही. मुलींनी अविचाराने कोणाशीं संबंध जोडूं नये या म्हणण्यांत थोडासा अर्थ आहे, पण असा संबंध निदान तात्पुरता असतो. अनिष्ट संबंधाचा धोका विवाहांतच अधिक, कारण पाहिजे तेव्हां घटस्फोट मिळत नाही. तेव्हा मुलींचा बचाव करणें असेल तर विवाहापासूनच करणें अधिक महत्त्वाचें आहे. अर्थात् हल्ली कुमारी मुलीचें लग्न अधिक सुलभ असतें इतकेंच नव्हे, तर लग्नाची मुलगी कुमारी आहे असेंच लोक धरून चालतात, पण याचा अर्थ इतकाच आहे की लोक कौमार्याला महत्त्व देतात. तें कां देतात हा प्रश्न राहतोच. लग्नानंतर मुलगी कुमारी नव्हती असें आढळलें तर आपण फसलों असें नवरा समजतो. पण वस्तुतः पुरुषांना कौमार्य आवडण्यास कांहीच कारण नाही, आणि खरें म्हटलें तर आपण फसलों असें जो नवरा समजेल असें वर सांगितलें, तोच एखाद्या विधवेशीं किंवा सोडलग्न झालेल्या स्त्रीशीं विवाह करण्यास मागेपुढे पाहणार नाही.

तसें पाहिलें तर अविवाहित मुलीकडे पुरुष फारसें लक्षच देत नाहीत. याचें कारण पुरुषांना विचारलें तर ते म्हणतात "त्या इतक्या चमत्कारिक रीतीनें वागतात की त्या एखाद्या परक्या जातीच्या असाव्यात असा भास होतो. त्यांच्याशीं काय बोलावें हेंच कळत नाहीं. कधी कधी त्या एकदम बुजतात आणि त्यामुळे आपल्यालाही बुजल्यासारखें होतें. जणूं काय आमची भाषाच त्यांना समजत नाही." एखाद्या दिवाणखान्यांत विवाहित आणि अविवाहित स्त्रिया असल्यास पुरुष कसे वागतात ते पहावे. बहुतेक सर्व पुरुष विवाहितांच्या भोंवतीं जमा होतात आणि लाजरे, बोलायला भिणारे पुरुष असतील तेवढेच अविवाहितांच्या वांट्याला येतात. यावरून असेंच अनुमान निघतें की कौमार्य हें पुरुषांना मुळीच आकर्षक वाटत नाही. जिला प्रेमाचा अनुभव आहे तीच अधिक आकर्षक होते. कौमार्यांतील खोटा विनय आणि दाबलेली कामवासना यांत आकर्षण नसतें. प्रेमशिक्षणाने धीट झालेली स्त्रीच आकर्षक होते. एखाद्या कुमारीकडे जो पुरुष कधी पहात देखील नाही, तिचेंच लग्न झाल्यावर ती त्याला आकर्षक वाटूं लागते. तेव्हा कौमार्य नष्ट झाल्यावरच तिच्यांत पुरुषांना आकर्षण करण्याची शक्ति येते आणि तिचें लग्न होण्याचा संभवही त्या मानाने अधिक वाढतो, कारण आकर्षणाशिवाय पुरुष मागणी घालीत नाहीत. शिवाय हल्लीच्या पद्धतींत तिची फारच थोड्या पुरुषांशी ओळख होते. कौमार्यावरील निर्बंध काढल्यास ती अधिक पुरुषांशीं होईल आणि तिला लग्न करणें अधिक सोपें होईल. अर्थात् कौमार्याचें हल्लींचें महत्व नाहीसें झालें पाहिजे.

स्त्रियांच्या दृष्टीने कौमार्याचें बिलकुल महत्व नाही. पुरुषांना तें कां वाटतें, याचें कारण पुरुष स्वार्थी असतात असें सांगतात. पण वास्तविक ही केवळ चाल आहे, यापेक्षा त्याला अधिक कांहीं कारण नाही, कारण कुमारीसंबंधी पुरुषांना आकर्षण वाटत नाही. कदाचित् कोणी असें म्हणतील की कुमारीला प्रेमाशिक्षण देण्यांत पुरुषांना कांही विशेष प्रकारचा आल्हाद वाटत असेल, परंतु हल्ली तसें होणें शक्यच नाही, कारण शिक्षण देण्यास पुरेसें ज्ञान

पुरुषांनाच नसतें. मी म्हणतों ती पद्धति अंमलांत आल्यासच पुरुषांना तसें ज्ञान मिळेल, आणि मग हा विशेष आनंदही मिळेल. ( पुरुषांना प्रौढ स्त्रियांकडून आणि स्त्रियांना प्रौढ पुरुषांकडूनच समागमाचे पहिले धडे मिळावे, असें लेखकाचें मत आहे. **संपादक.** ) अविवाहित मुलीने कौमार्य राखल्याने ती विवाहानंतर अधिक नीतीने राहील म्हणावें, तर तसें हल्ली बिलकुल दिसत नाही.

मी म्हणतों त्या पद्धतींत एखादी स्त्री कुमारी राहिली, तर त्याचा अर्थ असा होईल की तिला कामवासनाच कमी आहे, किंवा तिची वाढ फार साव-काश होत आहे. पण याचा नीतीशीं कांही संबंध नाही. सध्यांच्या स्थितींत बहुतेक सर्वच मुली कौमार्य राखतात, पण त्याचा अर्थ असा नव्हे की त्यांना कामवासनाच नसते. त्याचा अर्थ इतकाच की आपण वासना मारली नाही तर काय भयंकर परिणाम होतील याची त्यांना जाणीव असते. पण लग्नानंतर ही भीति रहात नाही, तेव्हा अशी मुलगी लग्नानंतर नीतीनें राहील असें कसें समजावें ? तेव्हा पुरुषांच्या सुखाच्या दृष्टीने, किंवा विवाहित स्त्रियांच्या नीतीच्या दृष्टीनेही कौमार्याचा उपयोग नाही.

तरमग बाकी काय राहिलें ? आपली बायको आपल्याशिवाय कोणी वापरतां नये असें का तुमचें म्हणणें आहे ? असें असेल तर बायकोला झना-न्यांत कोंडून तिच्यावर पाहरा ठेवा, आणि तिला बुरखा घेतल्याशिवाय रस्त्यांत दिसूं देऊं नका, आणि लोकांना सांगा ‘ ही बायको माझी आहे, आणि तिला कोणीं हात लावला तर मी त्याला ठार मारीन ! ’ पण असे विचार कोणी कबूल करील का ? आणि असे विचार खरोखरच तुमच्या मनांत येतात तरी का ? एखादा शेतकरी जसा आपल्या कोंबड्या किंवा फळझाडें जतन करून ठेवतो, तशी बायको जतन करून ठेवायला तुम्हाला लाज नाही वाटणार ? खरें म्हटलें तर धार्मिक श्रद्धा नाहीशी झाल्या-वर जशा कांही वेडगळ समजुती शिल्लक राहतात, तशीच ही कौमार्याची महति शिल्लक राहिलेली आहे. अर्थात् कांही अपवादात्मक उदाहरणांत प्रेम इतकें

उत्कट असेल की अशा वेळीं भूत आणि भविष्य कालाबद्दल देखील असूया वाटेल, आणि अशा प्रेमाबद्दल मला आदर वाटतो. पण अशीं उदाहरणें म्हणजे अपवादच, आणि म्हणूनच कदाचित् आपल्याला त्यांच्याबद्दल आदर वाटेल. पण अशा लोकांकरतां सर्वांनीच कौमार्याला फाजील महत्व दिलें पाहिजे काय ? असे लोक व्यक्तिशः कितीही उच्च असले, तरी त्यामुळें ही नीतीची पद्धत उच्च होत नाही. बायकांनाही कधीकधी अशा प्रकारची असूया वाटेल, म्हणून पुरुषांवरही कौमार्याबद्दल असेच निर्बंध घालावे असें कोणीही म्हणणार नाही. आणि अर्थात् ज्यांना कौमार्य राखावेंसें वाटत असेल, त्यांना आडकाठी करावी असें मी म्हणतच नाही. कौमार्य राखण्याची सक्ती नसावी इतकेंच मी म्हणतों.

माझ्या पद्धतींत एखादे वेळीं असेंही होईल की एखाद्या मुलीचें प्रेम एखाद्या पुरुषावर कायमचें बसेल किंवा एखाद्या पुरुषाचेंही एखाद्या स्त्रीवर तसेंच प्रेम बसेल, आणि त्यांचें लग्न होऊन तीं जन्मभर सुखी होतील. अशा स्त्रियांना तात्पुरत्या प्रेमांत सांपडण्याची भीतिच नाही आणि त्यांना तसा कोणी कायमचा प्रेमी सांपडेपर्यंत शरीरसंबंध करण्याचें कारण नाही. हल्ली सर्वत्र स्त्रियांना पावित्र्याच्या कल्पनेमुळे आपलें शरीर जपून ठेवावें लागतें. तसें नंतर कांही थोड्या स्त्रियांना वाटल्यास सहज करतां येईल, परंतु अशा अपवादात्मक स्त्रियांकरतां एकंदरींत स्त्रियांना सामान्यतः हानिकारक असे हल्लीचे नीतिनियम लागू करण्यांत अर्थ नाही. हे नीतीनियमच कोणत्याही वैवाहिक सुधारणेच्या आड नेहमीं येत असतात.

प्रसिद्ध लेखक 'स्तांदाल्' यानेही अशाच प्रकारचें मत दिलें आहे. रूसोनें लिहिलें आहे की 'नीतिमान समाजांत अविवाहित स्त्रियांना कडक नियम लागू नसतात, आणि विवाहित स्त्रियांना मात्र लागू असतात. अनीतिमान समाजांत याच्या विरुद्ध स्थिति असते.' बाल्झॅक्नें या मताला दुजोरा दिला आहे. हल्लीच्या नीतीचा परिणाम काय होतो पहा. एका बाजूला हजारों अविवाहित मुलींना समागमाची परवानगी नसल्यामुळे त्यांना केवळ कल्पनेचे खेळ करीत एकलकोंडें आयुष्य काढावें लागतें, आणि दुसऱ्या बाजूला पहावें तों हजारों वेश्यांना

शरीरविक्रय करून पोट भरावें लागतें. एका बाजूला हजारों कुमारिकांना अतृप्त कामवासनेमुळे संतप्त मनःस्थितींत तडफडत रात्र काढावी लागते, आणि दुसऱ्या बाजूला वेश्यांना सुखाची बिलकुल अपेक्षा न करतां पोटाकरतां लोकांना शरीर भाड्यानें द्यावें लागतें ! या पद्धतींत कोणालाही सुख नाही. अविवाहित मुलींना आपली नैसर्गिक आकांक्षा जबरदस्तीनें मारावी लागते, आणि वेश्यांना इच्छा नसतांना जबरदस्तीनें समागम करावा लागतो. एका जबरदस्तीमुळेच दुसरी जबरदस्ती उत्पन्न होते. जे लोक वेश्यांकडे जातात, त्यांना खरोखर तेंच आवडतें काय ? त्यांचें तारुण्य आणि पौरुष वेश्यांवर खर्च होतें आणि भरीला त्यांना कधीकधी रोगही होतात. ते काय स्वाभाविक आवडीमुळे ? अशी आवड कोणालाही नसतें. मनुष्य कितीही अशिक्षित आणि ओबडधोबड असला, तरी त्याला कामवासनेच्या तृप्तीबरोबरच थोडेंबहुत प्रेम पाहिजे असतें. निदान समागमानें केवळ स्वतःचेंच समाधान न होतां स्त्रीचेंही समाधान व्हावें अशी इच्छा सर्वांना असते. वेश्यावृत्तीचे परिणाम सर्वांना माहीतच आहेत, पण वेश्यावृत्तीशीं प्रथम संबंध येतांना ज्यांना धक्का बसत नाही असे पुरुष क्वचितच सांपडतील. तरुणांना आपल्या बरोबरीच्या तरुणीच साहजिक आवडतील, आणि त्या तरुणींनाही ते आवडतील यांत शंका नाही. पण उपवर मुलींना तर समागमाची परवानगी नसते, तेव्हा त्या तरुणांनी काय करावें ? त्यांना दम धरवत नाही. आणि त्यांची गरज भागविणें इतर स्त्रियांना भाग पडतें. इतकेंच नाही तर कांही स्त्रियांना समागम करूं न दिल्यामुळें वेश्यांना फाजील काम पडतें. यामुळे एका बाजूला अविवाहित मुलींची कामवासना अधिकाधिक तीव्र होत जाते, आणि वेश्यांना फाजील काम पडल्यामुळे त्या त्रासतात आणि कंटाळतात. कुमारिकांना समागमाची परवानगी नाही, वेश्यांना समागमाच्या धंद्यांतून बाहेर पडण्याची परवानगी नाही, कारण पुरुषांची गरज तर भागली पाहिजे. म्हणजे ज्यांना त्यापासून आनंद होईल त्यांना परवानगी नाही, आणि ज्यांना त्रास होतो त्यांच्यावर सक्ती आहे.

कोणी म्हणेल की वेश्यावृत्तीचीं कारणें पुष्कळ आहेत. पुष्कळ बायकांना

पोट भरण्याला पुरेसें काम मिळत नाहीं म्हणून त्या हा धंदा करतात. हें खरें असलें तरी एकंदरींत वेश्यावृत्तीचीं जीं बरींच कारणें आहेत, त्यांत जबरीच्या कौमार्याला मुख्य स्थान दिलें पाहिजे. कारण स्त्रियांना काम मिळालें तरी जोंपर्यंत पुरुषांची गरज भागत नाही तोंपर्यंत हा धंदा रहाणारच. पण एकदां जबरीचें कौमार्य बंद झालें की पुरुषांची गरज आपोआप भागेल आणि मागणी कमी झाल्यामुळे वेश्यांचा धंदा जवळजवळ बंद होईल. वेश्या राहिल्याच तर त्या परकीयांची, आजारी लोकांची, किंवा लाजऱ्या लोकांची गरज भागवतील. पण त्या हल्लीसारख्या एक सामाजिक गरज होऊन बसणार नाहीत.

एकंदरींत ब्लूम् यांचें म्हणणें असें आहे की तरुणांना व तरुणींना आपआपल्या आवडीप्रमाणें समागमाची परवानगी द्यावी व त्यांना चंचल आयुष्याचा कंटाळा येऊन आतां मनःशांति पाहिजे असें वाटूं लागलें, म्हणजे मग दोघांनीही लग्न करावें आणि आपल्या मुलांच्या संगोपनाकडे लक्ष द्यावें. अर्थात् विवाहापूर्वी मुलें होण्याचें कारण नाही. संततिनियमनाचे मार्ग सर्वांना माहीत असावे असें त्यांनी गृहीत धरलें आहे. त्याचप्रमाणे रोगसंसर्गही होण्याचा संभव यामुळें कमी होईल आणि त्यांतही प्रतिबंधाचे मार्ग सर्वांना माहीत असावेच. तारुण्यांतील चंचलवृत्ति अशा तऱ्हेने तारुण्यांतच जर तृप्त केली नाही, तर पुढे विवाह झाल्यावर केव्हांतरी त्याचा वचपा निघतो आणि विवाहित माणसें व्यभिचार तरी करतात, किंवा त्यांना अत्यंत मानासिक ताप होतो. त्याऐवजी प्रथमच चंचलवृत्तीला जरूर तो वाव देऊन नंतर विवाह केल्यास तो धोका नाहीसा होईल, किंवा एखादे वेळीं एखाद्याने व्यभिचार केलाच तरी त्याचें विशेष कांहीं वाटणार नाही, कारण पति व पत्नी या दोघांनाही मानसिक स्वास्थ्य पाहिजे असतें,आणि असा व्यभिचार केवळ तात्पुरता असतो. या पद्धतीनें विवाहसंस्थेला अधिक स्थिरता येईल आणि विवाहाचा मुख्य उद्देश मनःस्वास्थ्य आणि मुलांचें संगोपन हाच असल्यामुळे घटस्फोटाचीही इच्छा होणार नाही. विवाहसंस्था जास्त भक्कम पायावर उभारावी याच उद्देशानें आपण हें पुस्तक लिहिलें आहे असें लेऑं ब्लूम् यांचें म्हणणें आहे.

# स्वसंभोग

———:०:———

डॉ. विल्हेल्म् ष्टेकेल् यांनी लंडन येथील लिंगशिक्षणसंघापुढे गेल्या ५ दिसेंबर रोजीं दिलेल्या व्याख्यानाचा सारांशः—

डाक्तरमजकुरांनी प्रथम स्वतःचा लहानपणचा अनुभव सांगितला. त्यांची आई इतर आयांप्रमाणे मुलांनी जननेंद्रियास हात लावल्यास त्यांना रागें भरत नसे, ती तिकडे लक्षच देत नसे. ते शाळेंत जाऊं लागल्यावर देखील शिक्षक काय सांगतो तिकडे लक्ष देण्याऐवजी त्यांचें लक्ष असल्या गोष्टींकडेच जास्त असे, आणि तरीसुद्धां ते पुढे मोठ्या योग्यतेला चढले. यावरून अशा स्वातंत्र्याचा मुलांवर वाईट परिणाम होत नाही असें दिसतें. परंतु कालेजांत गेल्यावर स्वोद्दीपनाचे भयंकर परिणाम वर्णन करणारें एक पुस्तक त्यांचे हातांत पडलें. या संवयीमुळे वेड लागतें, नपुंसकत्व येतें, अर्धांगवायु होतो, इत्यादि अनेक खोट्या गोष्टी त्यांत लिहिलेल्या होत्या. त्यामुळे घाबरून जाऊन ती संवय सोडण्याचा त्यांनी प्रयत्न केला, आणि तेव्हापासून त्यांचे हाल सुरू झाले. ती संवय तर त्यांना सोडतां येईना, आणि अभ्यासाकडे किंवा खेळाकडेही लक्ष लागेना. त्यांना व्यायामाची आवड होती, आणि या मार्गाने आपल्याला मनोनिग्रह करतां येईल अशी त्यांना आशा वाटत होती, पण फुकट. ते बऱ्याच डाक्तरांकडे गेले, मानसिक उपचारतज्ज्ञांकडे गेले, विजेचे उपचार केले, पण कांही उपयोग झाला नाही. धर्मबाज आणि नीतिबाज लेखकांनी सांगितल्याप्रमाणे आपल्या वीर्याबरोबर जीवनशक्ति बाहेर जाते, आणि नपुंसकत्व येऊन लवकरच आपण मरणार, अशी त्यांची ठाम समजूत झाली होती.

या भीतींतून त्यांना दुसऱ्या एका पुस्तकाने आणि एका न्हाव्यानें सोडविलें. पुस्तकावरून त्यांना कळले की स्वप्नावस्था फक्त आपल्यालाच होतें असें नाही, बहुतेक सर्वांनाच होते, आणि न्हाव्याने त्यांना एकदां विचारलें, 'तुम्ही इतके खिन्न कां ?' आणि त्यांनी स्वसंभोग आणि स्वप्नावस्था हीं कारणें

सांगितल्यावर तो म्हणाला 'या दोन्ही गोष्टींचा माझा आज ४५ वर्षांचा अनुभव आहे, आणि मी अजून मेलों नाही. मग तुम्हीच कां भितां ? तेव्हापासून त्यांचें अभ्यासाकडे आणि खेळाकडेही लक्ष लागूं लागलें. त्यांनी पुढें असें सांगितलें की या संवयीपासून नुकसान झालेंच तर तें मानसिक कल्पनांमुळे होतें, तो प्रत्यक्ष शारीरिक परिणाम नव्हे. सर्व मुलें आजपर्यंत स्वसंभोगच करीत आलीं आहेत, आणि तरी देखील मनुष्यजातीचा अजून लय झालेला नाही. पण आईबापांना हें समजत नाही, आणि त्यांनी अडथळा केल्यामुळे त्यांच्याविषयी मात्र मुलांच्या मनांत शत्रुभाव उत्पन्न होतो, आणि तो उघडपणें तर दाखवतां येत नाही, यामुळे मुलांना मानसिक त्रास होतो. इतकेंच नव्हे तर त्या संवयीपासून जें समाधान वास्तविक मिळायचें तेंही पालकांच्या भीतीमुळे मिळत नाहीसें होतें.

यानंतर डॉ. ष्टेकेल यांनी या संवयीचे कांही फायदे सांगितले. या संवयीपासून समाजाचें कोणत्याही प्रकारचें नुकसान न होतां इतरांवर अत्याचार केल्याशिवाय मनुष्याचें समाधान होतें, हा समाजाचा फायदाच आहे. तुरुंगांत किंवा इतर ठिकाणीं जेव्हा मनुष्याला एकटें राहण्याचा प्रसंग येतो, तेव्हा त्याला कामवासना शमवण्याचा एवढाच मार्ग असतो.

---

# पुरुषाचें शरीर कसें असावें ?

डॉ. पॅतो यांचे फ्रेंचचे आधारें

सौंदर्याची व्याख्या जर आरोग्याच्या दृष्टीने केली तर मनुष्याचें शरीर असावें कसें हें त्या व्याख्येवरून समजेल. अर्थात् तें सामान्यतः असतें कसें, हा प्रश्न अगदीं वेगळा आहे, आणि या दोहोंचा घोटाळा करतां नये. कारण सामान्यतः मनुष्याचें शरीर असावें तसें नसतें.

येथे फक्त पुरुषाच्या शरीराचाच विचार करायचा आहे. तें कसें असावें

यासंबंधी बऱ्याच चुकीच्या कल्पना लोकांत पसरलेल्या दिसतात. धंदेवाईक पहिलवान पाहिले तर त्यांचें शरीर पुष्कळ वेळां इतकें बेढब दिसतें की असें शरीर कमावण्याची इच्छा कोणाला कां व्हावी हें कळत नाही. कांही विशिष्ट स्नायु भलत्याच प्रमाणांत वाढलेले असल्यामुळे या स्नायूंची शक्ति पाहून जरी अचंबा वाटला तरी आरोग्याच्या दृष्टीने त्यांत कोणताही फायदा नसतो. शिवाय या लोकांनी एकदां नियमित व्यायाम सोडून दिला म्हणजे त्यांचें पोटहि बेसुमार वाढून त्यांच्या बेढबपणांत भर पडते. तेव्हा शरीराचे बाबतींत पहिलवानांना आदर्श समजतां येत नाही.

अर्थात् चांगलें शरीर म्हणजे त्यांतील प्रत्येक भागाचें माप अमुक असलें पाहिजे किंवा निदान अवयवांचें प्रमाण अमुकच असलें पाहिजे, असें निश्चित सांगतां येणार नाही, कारण निरोगी शरीराचेहि पुष्कळ प्रकार होतील. विशेषतः शिद्दी, चिनी वगैरे विशिष्ट गटांतील लोकांत जे शारीरिक विशेष दिसतात, ते आरोग्याला बाधक होत नाहीत असें दिसतें. तेव्हा सर्वांना लागू पडतील असे कांही सामान्य नियम आहेत की काय, एवढेंच येथे पहायचें आहे.

प्रथम शरीराच्या पुढच्या भागाचा विचार करूं. छाती हा शरीराचा विशेष महत्वाचा भाग आहे, कारण श्वासोच्छ्वासास जरूर असणारीं फुप्फुसें आणि रुधिराभिसरणास उपयोगी असणारें हृदय हीं या भागांत असतात. तेव्हा छाती मोठी असली पाहिजे हें उघड आहे. तसेंच गळ्याचे दोन्ही बाजूचीं आडवीं हाडें स्पष्ट दिसलीं पाहिजेत, आणि जवळजवळ जमिनीशीं समांतर असलीं पाहिजेत. उराचें मधलें हाड बरोबर सरळ उभें नसून मध्यभागीं पुढें आलेलें असावें. या हाडाच्या दोन्ही बाजूंना बरगड्यांचीं टोकें कातडीखाली दिसल्यास हरकत नाही. छातीच्या स्नायूंची खालची कडा स्पष्ट दिसली पाहिजे. पुष्कळांच्या छातींत पुष्कळशी चरबी सांचलेली असते आणि यामुळे छाती जवळजवळ स्त्रीच्या स्तनांसारखी पुढे आलेली असते. हें अर्थातच इष्ट नाही. या रेषेच्या खाली दोन्ही बाजूंना बरगड्या जवळजवळ जमिनीशीं समांतर असल्या पाहिजेत. अर्थात् या बरगड्यांवर स्नायूंचें आच्छादन असतें.

# पुरुषाचें शरीर कसें असावें ?

ढुंगणाची रुंदी खांद्यांच्या रुंदीपेक्षा कमी असली पाहिजे आणि ढुंगणाच्या हाडांच्या वरच्या कडा स्पष्ट दिसल्या पाहिजेत. तसेंच पोट फार पुढें आलेलें किंवा फार आंत गेलेलेंहि असतां नये. पोटाचा आकार महत्वाचा आहे. त्यांतील दोन्ही बाजूंचे उभे मोठे स्नायु स्पष्ट दिसले पाहिजेत, आणि छातीच्या मधल्या हाडाच्या खालच्या टोंकापासून तों बेंबीपर्यंत स्पष्ट उभी रेषा आंत गेलेली असून तिने पोटाचे दोन भाग झालेले दिसले पाहिजेत. ही रेषा म्हणजे उभ्या स्नायूंची आंतली कडा होय. याच्या दोन्ही बाजूंना सुमारें तीन इंचांवर या स्नायूंच्या बाहेरच्या कडा दाखवणाऱ्या दोन उभ्या रेषा स्पष्ट आंत गेलेल्या दिसल्या पाहिजेत, आणि या उभ्या रेषांच्या मधल्या भागाचे आणखी विभाग आडव्या रेषांनी पडलेले असले पाहिजेत. हे सर्व विभाग प्राचीन ग्रीक पुतळ्यांत स्पष्ट दाखवलेले असतात, परंतु सामान्यतः पाहूं गेल्यास हे विभाग बहुधा दिसतच नाहीत. कारण बहुतेक पुरुषांच्या पोटाच्या मोठ्या उभ्या स्नायूंची वाढ व्हावी तशी झालेली नसते, आणि यामुळे पोट म्हणजे एक मोठा गोळा दिसतो.

नाभीच्या खाली मधली रेषा आंत गेलेली असत नाही, फक्त दोन्ही बाजूंच्या उभ्या रेषा मात्र असतात. छातीच्या खाली कधी कधी कमर किंचित् आंत गेलेली असते, कधीकधी छातीपासून ढुंगणापर्यंत रुंदी सारखीच राहिलेली असते.

पाठीकडून पाहिल्यास मानेपासून ढुंगणापर्यंत पाठीचा कणा स्पष्ट आंत गेलेला दिसला पाहिजे. पाठीकडून छाती व पोट असे दोन भाग दिसत नाहीत, व मधल्या रेषेने शरीराचे दोन सारखे भाग झालेले दिसतात. पाठीकडून मानेशीं उंचवटा दिसतां नये. डोकें पुढे गेलेलें असलें तरच हा उंचवटा दिसेल, व अशा वेळीं पाठीला पोंक येईल, आणि मध्यरेषा आंत गेलेली दिसण्याऐवजीं कदाचित् पाठीचा कणा बाहेर आलेला दिसेल. वास्तविक हात पुढे नेऊन पाठ वांकवल्याशिवाय असा प्रकार दिसतां नये.

कण्याच्या दोन्ही बाजूंना, मध्यरेषेपासून सुमारें दोन इंचांवर, खांद्यां-

मागच्या सपाट हाडांच्या कडा सरळ उभ्या दिसल्या पाहिजेत. अर्थात् या कडांवर स्नायूंचें आवरण असतें, आणि हे स्नायु भक्कम असल्यास मनुष्य शक्तिमान दिसतो.

पाठीचा खालचा भाग किंचित् आंत गेलेला असतो. तथापि हा भाग घोड्याच्या खोगिरासारखा दिसतां नये. छाती व पोट हे शरीराचे महत्वाचे भाग असूनहि बहुतेक पुरुषांत हेच भाग अत्यंत बेढब असतात. याचें कारण हातां-पायांना जसा नेहमीं व्यायाम मिळतो, तसा छातीला व पोटाला मिळत नाही. पोट फाजील पुढें आलें म्हणजे पाठीलाहि साहजिकपणें फाजील बांक येतो.

हात व शरीर यांचा सांधा जोडणारा खांद्याचा स्नायुहि चांगला मजबूत असला पाहिजे, व दंडाचा स्नायुहि चांगला उठून दिसला पाहिजे. परंतु वजन उचलण्याचा व्यायाम करणाऱ्या लोकांत छातीचे, खांद्यांचे व दंडांचे स्नायु इतके फाजील वाढलेले असतात की असें शरीर सुंदर म्हणणें अशक्य आहे. मांडीचा स्नायुहि प्रामुख्यानें दिसला पाहिजे; आणि पोटरीचा वरचा भाग भरीव व फुगीर असला पाहिजे. परंतु मनगटाशीं किंवा घोट्याशीं फाजील मांस असलेलें बरें नाही. या ठिकाणीं स्नायु नसून केवळ हाडें आणि त्यांचे सांधे असतात, तेव्हा याचा आकार लहान असणार. अर्थात् इतर शरिराचे मानाने तो लहान असावा इतकेंच. फाजील लहान असल्यास हे भाग कार्यक्षम होणार नाहीत, आणि घोट्याच्या हाडावर तर सबंध शरीराचा भाग तोलला जातो. या बाबतींत प्रचंड शक्तीचीं कामें करणारा ग्रीक योद्धा हर्क्यूलिस् याच्या पुतळ्यांत घोटे फाजील बारीक दाखवले आहेत. ती शिल्पकाराची चूक म्हणावी लागते.

# जमिनीशिवाय लागवड

‘ प्रेस मेडिकॅल ’ वरून

केवळ पाणी आणि कांही खनिज पदार्थ यांचे योगाने वनस्पतींची लागवड करतां येते हें आज बरेच दिवस माहीत झालेलें आहे. यीस्ट्ची वाढ अशा तऱ्हेने

करतां येते हें पॅस्तरने दाखविलें, परंतु त्यापूर्वीही याचा पुरावा नव्हता असें नाही. समुद्रांत अनेक वनस्पतींची विपुल वाढ होते यावरून ही गोष्ट सिद्धच होती. या वनस्पतींना समुद्रांतील फॉस्फोरिक ॲसिदचा व नैट्रिक ॲसिदचा उपयोग वाढीकरतां होतो. अर्थात् हे दोन पदार्थ सुपीक जमिनींत पुष्कळच अधिक प्रमाणांत असतात, परंतु समुद्रांत हे पदार्थ पातळ स्थितींत असल्यामुळे त्यांचा अधिक चांगला उपयोग होतो.

या वाढीकरतां सूर्यकिरणांचाही उपयोग होतो आणि सूर्यकिरणांचा परिणाम चारपाचशें फूट खोलीपर्यंत होऊं शकतो. एकंदर समुद्राचा विस्तार पाहतां जमिनीपेक्षां कितीतरी जास्त वनस्पति समुद्रांत उत्पन्न होतात हें सहज दिसेल.

अन्नाला उपयोगी वनस्पतींची लागवड जमिनीशिवाय करण्याचा प्रयत्न अनेक तज्ञांनी केला आहे. मक्याच्या दाण्यांना वाढीकरता कॅल्सिअम्, पोटॅसिअम्, व लोह यांचीं नैट्रेट, सल्फेट, फॉस्फेट आणि क्लोराइड् हीं रसायनें पाण्यांत विरवून पुरविल्यास त्यापासून झाडें तयार होतात. यांतील मुख्य अडचण म्हणजे फक्त मुळें मात्र या पाण्यांत बुडतील आणि बाकीचा भाग वर राहील अशी व्यवस्था करणें. फुलांची लागवड अशा रीतीनें केलेली पुष्कळांनी पाहिली असेल. मध्यभागीं कांदा, त्याच्या खालच्या बाजूला मुळें पाण्यांत पोंचलेलीं, आणि वरच्या बाजूला पानें आणि फुलें लवकरच येतात.

गेल्या तीन वर्षांत अशा रीतीनें फुलझाडें, फळझाडें आणि इतर प्रकारचीं झाडें, यांची लागवड करण्याचे प्रयत्न मोठ्या प्रमाणावर झालेले आहेत. कॅलिफोर्निया येथील युनिव्हार्सिटीनें या बाबतींत पुढाकार घेतला आणि अमेरिकेंत अशा रीतीनें टमाटो, बीटरूट, गाजर, बटाटे, स्ट्रॉबेरी तयार करून विकण्याकरितां निदान तीन कारखाने निघालेले आहेत. यानंतर फ्रान्समधेंही हे प्रयोग आणखीही कित्येक वनस्तींचे बाबतींत झालेले आहेत. व्हेर्साय येथील अशा प्रकारच्या प्रयोगशाळेंत दररोज शेंकडों प्रेक्षक जात असतात. ' जार्दिनाज ' ( बागाईत ) नांवाच्या मासिकांत यासंबंधाची माहिती प्रसिद्ध होत असते. त्यांत पुढील व्यावहारिक माहिती दिलेली आहे.

ज्या भांड्यांत वरील रासायनिक पाणी तयार करून ठेवायचें, त्या भांड्यांच्या बाजूवर त्या पाण्याचा रासायनिक परिणाम होतां नये, ही महत्वाची गोष्ट आहे. या भांड्यांच्या वर जाळ्या ठेवलेल्या असतात, व त्या जाळ्यांतून फक्त झाडांचीं मुळें मात्र पाण्यांत बुडावीं अशी योजना असते, कारण जास्त भाग पाण्यांत बुडाल्यास तो कुजूं लागेल. या जाळ्यांच्यावर ' फैब्रो–सिमेंट ' च्या लाद्या असून त्यांत ठेवलेल्या भोंकांतून झाडांचीं मुळें खालीं उतरतात. या लाद्यांचा उपयोग असा की खालील पाण्यावर उजेड पडूं नये, कारण उजेड पडल्यास त्याचा मुळांवर परिणाम होईल इतकेंच नव्हे, तर पाण्यांत फालतू वनस्पतींची वाढ होऊन पाण्यांतील पोषक द्रव्यें त्या खाऊन जातील. जें झाड लावायचें असेल, त्याला योग्य ते पदार्थ पाण्यांत असले पाहिजेत. त्यांतील मुख्य म्हणजे ॲमोनियाच्या लवणांच्या स्वरूपांत नैट्रोजन, पाण्यांत विरतील अशीं फॉस्फेटें किंवा प्रत्यक्ष ' फॉस्फोरिक ॲसिद ' च्या स्वरूपांत फॉस्फरस, पोटॅसिअमचीं क्लोराइड, सल्फेट, फॉस्फेट व नैट्रेट हीं लवणें ( सोडिअमचें महत्व विशेष नाही ), ' कॅल्सिअम नैट्रेट ' चे स्वरूपांत कॅल्सिअम्, मॅग्नीसिअम सल्फेटचे स्वरूपांत मॅग्नीसिअम, लोह, गंधक, आणि अत्यंत सूक्ष्म प्रमाणांत ' बोरन, ' या सर्वांची वाढीला मदत होते. यांपैकीं नैट्रोजन, पोटॅसिअम, फॉस्फोरिक ॲसिद आणि कॅल्सिअम यांचें प्रमाण विपुल असावें लागतें.

पाण्यांत लवणें कोणतीं असावीं एवढीच एक महत्वाची गोष्ट आहे असें नाही. त्या पाण्याची आम्लता किंवा अल्कता हीही महत्वाची बाब आहे. किंचित् आम्ल असेंच पाणी असलेलें बरें, व ही आम्लता सहज दिसावी अशी योजना असते. पाण्याची पातळी कायम राहिली पाहिजे, म्हणजे तें कमी होऊं नये म्हणून, आणि त्यांतील लवणांचें प्रमाण कायम रहावें म्हणून, त्यांत मधून मधून औषधी पाणी भरीला घालावें लागतें. शिवाय पाण्याची उष्णता थोडी वाढवण्याने फायदा होतो. याकरतां पाण्यांत विजेच्या तारा ठेवणें हा सर्वांत उत्तम

मार्ग आहे, परंतु यापेक्षां कमी खर्चाची योजना करणें शक्य आहे. उष्णता कायम रहावी म्हणून थर्मोस्टॅट नांवाचें यंत्र वापरावें लागतें.

कल्पनाही होणार नाही अशीं पिकें या पद्धतीनें काढतां येतात. एक एकर जमिनींत जवळ जवळ अडीच हजार बुशेल '( ८० पौंडांचें माप ) बटाटे किंवा साडेपांचशें टन टमाटो काढतां येतात, असा अमेरिकेंतील अनुभव आहे. फ्रान्स-मधें प्रदर्शनांत ११० दिवसांत १३ फूट वाढलेलीं टमाटोचीं झाडें दाखवलीं होतीं, आणि या प्रत्येक झाडापासून ११ ते १५ पौंड फळें मिळालीं होतीं. अशीं झाडें कित्येक वर्षें जगूं शकतील.

या वाढीला पाणी लागतें खरें, पण तें जमिनीला लागणाऱ्या पाण्यापेक्षां पुष्कळच कमी असतें. जमीन प्रत्यक्ष वाढीला लागत नसली तरी हें सर्व ठेवण्या-करतां जमीन लागतेच, आणि वर सांगितलेलीं रासायनिक द्रव्येंही लागतात. शिवाय हें सर्व काळजीपूर्वक केलें तरच यशस्वी होतें, तेव्हां याचें जरूर तें शिक्षण घेतलेलीं माणसें लागतात. परंतु ही सामग्री असल्यास खडकाळ जमि-नीवरही हीं पिकें काढतां येतील.

वरील पद्धतीनें जगांतील एकंदर अन्नाचा पुरवठा वाढवतां येईल यांत शंका नाहीं, परंतु त्यालाही मर्यादा आहेच, आणि लोकसंख्या कितीहो वाढली तरी अन्नाचा पुरवठा होईलच ही कल्पना खुळी आहे.

---

# पत्रव्यवहार

—:०:—

१

राजरत्न वा. वि. जोशी यांचें 'विवाहितांचें नंदनवन' हें पुस्तक आपणा-कडे पाठवीत आहें. त्यावर आपण अभिप्राय द्यावा अशी विनंती आहे.

आपला 'ज्ञानेच्छु'.

# समाजस्वास्थ्य

बडोद्यांतील सुधारणेचे आधारस्तंभ राजरत्न वा. वि. जोशी यांना गरीब बिचाऱ्या अज्ञ विवाहितांची दया येऊन त्यांचें जीवित सुखी व्हावें याकरतां त्यांना उपदेशामृत पाजण्याचा प्रयत्न त्यांनी या पुस्तकाच्या रूपानें केला आहे. अर्थात् त्यांचा प्रयत्न स्तुत्य आहे. परंतु अशा प्रकारचें पुस्तक लिहिण्यास ज्या ज्ञानाची जोड पाहिजे, तें मिळवण्याचा प्रयत्न त्यांनी केलेला नाहीं. यामुळे यांतील बराच भाग वाचनीय आणि विचारणीय असला तरी कांही केवळ ऐकीव गप्पा, कांही थापा, आणि कांही ठिकाणीं प्रचंड अज्ञान दिसून येत असल्यामुळे सामान्य वाचकाला यांतील ग्राह्य भाग कोणता आणि टाकाऊ कोणता हें बिलकुल कळणार नाही, आणि ज्यांना हें कळेल त्यांना या पुस्तकाची जरूरीच काय ? तसेंच कांहीं बाबींत सोंवळेपणा राखल्याने त्या केवळ माहितगारालाच कळणार, आणि माहितगाराला सांगण्याची काय आवश्यकता ?

हा ग्रंथ मुख्यतः विवाहसंस्थेची तरफदारी करण्याकरतां लिहिलेला आहे आणि ती करण्याकरतां यांत पुष्कळशा वकिली थापा दिलेल्या आहेत. पान १५-१६ वर लेखकानें बालविवाहाची जी तरफदारी केली आहे तींत मानसशास्त्राचें ज्ञान बिलकुल दिसत नाही. बालविवाहांत पतिपत्नी लहानपणापासून एकत्र वाढल्या-मुळे तीं जास्त समरस होतात असें म्हणण्यापेक्षा जुन्या पद्धतीच्या कुटुंबांत बालपणापासूनच मुलगी सासरीं गेल्यामुळे तिच्या मानसिक वाढीला वावच न मिळाल्यामुळे, आणि पतीला देव समजून वागल्याशिवाय गत्यंतरच नसल्यामुळे ती नाइलाजानें पतीच्या कह्यांत रहात असे, आणि आतां प्रौढविवाह रूढ झाल्या-पासून तिचें मन पूर्वीइतक्या सुलभ रीतीनें मारतां येत नाही, असें म्हणणें सत्याला अधिक धरून होईल. पान ५७ वर खुशाल ठोकून दिलें आहे की 'बहुतेक बाहेरख्याली पुरुषांच्या लग्नाच्या बायका स्वरूपानें सुंदर असतात, पण त्यांचीं प्रेमपात्रें निखालस कुरूपच सांपडतील'. जणूं काय सौंदर्य ही सहज कंटाळा आणणारी चीज आहे, आणि त्यामुळे सुंदर बायकांचे नवरे हटकून एखादें कुरूपच प्रेमपात्र धुंडून काढतात ! स्त्रीपुरुषांनी आपआपलीं रहस्यें एकमेकांना सांगूं नयेत, असें सिद्ध करण्यांत सबंध ६ वा भाग खर्ची घातला आहे. लेखकाचे मतें

असूया हा उत्तेजन देण्यासारखा गुण आहे असें दिसतें. सातव्या भागांत घरांतल्या कर्त्या पुरुषाला हिमालयाची उपमा देऊन त्याला घरांतल्या इतर माणसांनी त्रास दिल्यामुळे हुंदके देण्याची वेळ कशी येते याचें काव्यमय वर्णन केलें आहे, परंतु यांत आम्हाला बिलकुल तथ्य दिसत नाही. ही केवळ स्वतःच्या मोठेपणाची घमेंड आहे. पुढील दोन भागांत विवाहसंस्थेला टेकू देण्याकरतां 'अनुवंशिकतेचें शास्त्र' जरी मधें आणलें आहे तरी त्याची लेखकाला बिलकुल माहिती दिसत नाही. इतकेंच नव्हे तर उपमाउत्प्रेक्षांच्या धांदलींत तर्कशुद्ध लिखाण म्हणजे काय याचाही लेखकाला विसर पडला आहे. उदाहरणार्थ पान ८० वर 'जगांतील विवाहसंस्थेकडे जर आपण साकल्याने पाहिलें तर त्या संस्थेभोंवतीं विधिनिषेधाच्या उभारलेल्या तटबंदी ह्या दरएक कुटुंबाच्या वंशरक्षणासाठी, त्याच्या वंशाच्या उत्कर्षासाठीच निर्माण केलेल्या दिसतील. व्यभिचाराचा निषेध हा वैवाहिक गुन्हा ठरवण्यांत आला तो तरी कुटुंबाच्या संततींत रक्ताची सरभेसळ होऊं न देण्यासाठीच.' जणूं काय विवाहाचे निर्बंध सर्वत्र सारखेच आहेत! कोठे बालविवाह, कोठे प्रौढविवाह, कोठे एका पतीला कायद्याने एक बायको, कोठे चार बायका, कोठे अनेक बायका, कोठे विधवांना पुनः लग्न करतां येतें, कोठे येत नाही, कोठे लग्नापूर्वी स्त्रियांनी वेश्येचा धंदा केलेला चालतो. पण या सर्व निर्बंधांचा उद्देश मात्र श्री. जोशांच्या मतें एकच! व्यभिचाराने त्यांच्या मतें 'रक्ताची सरभेसळ' होते. इतके साधे जीवशास्त्राचे नियम देखील माहीत नसतांना या गोष्टींसंबंधी लिहिण्याचें धाडस लोक कसे करतात हें समजत नाही. कोणत्याही मुलांत एका पुरुषाच्या व एका स्त्रीच्या रक्ताची भेसळ नेहमीच होते, आणि यापेक्षा जास्त होणें निसर्गनियमांप्रमाणे अशक्य आहे. तेव्हा व्यभिचार गुन्हा ठरवला तो रक्ताची सरभेसळ होऊं न देण्याकरतां नव्हे, कारण ती होतच नाही, पण नवऱ्याचा मालकीहक्क गाजवण्याकरतां. असल्या थापांवर उभारलेल्या तरफदारीची किंमत काय, हें वाचकांनीच ठरवावें. थापा द्यायच्याच असल्या तर निदान त्या पचतील अशा द्याव्या! पान ८४ वर हे विद्वान सांगतात 'सुप्रजाजननाचा नियम पाहतां उत्तरोत्तर होणारीं मुलें हुषारींत व कर्तब-

गारींत जास्त लायक निपजतात. ' ही थाप आहे, आणि ती कशाकरतां ? तर पांच मुलें होईपर्यंत संततिनियमन करूं नये हें सांगण्याकरतां. त्यांच्या हिशोबानें पांचांपैकी दोन मुलें सामान्यतः मरतात आणि तीन मुलें असल्याशिवाय लोकसंख्या कायम रहात नाहीं. हें सर्वच खोटें आहे. पांचांपैकी दोन मरत नाहीत, लोकसंख्या कायम राहण्यास तीन मुलांची जरूर नसते, आणि लोकसंख्याही कायम न राहिली तरी कांहीच बिघडत नाही. आम्हाला लढाई करण्याकरतां लोकसंख्या जास्त पाहिजे, आणि आमची लोकसंख्या जास्त आहे म्हणून आम्ही आतां तुम्हाला लुबाडणार, अशीं उलटसुलट कारणें सांगणाऱ्या हिटलरमुसोलिनी-सारख्या दरवडेखोरांबद्दल लेखकाला मोठा आदर आहे, आणि हिंदुस्थानला सध्यां दरवडे घालतां येत नाहीत याचें त्यांना वाईट वाटतें. ही पशुवृत्ति माणसांना शोभत नाहीं असें आमचें मत आहे. यानंतर शेवटच्या भागांत सगळाच गोंधळ आहे. त्यांचे मतें रजपूत, शीख, चित्पावन, तेलंगे ब्राह्मण, काश्मिरी ब्राह्मण, इंग्लिश, फ्रेंच, जर्मन, अमेरिकन, या सर्व समाजांत संस्कारांचें आणि शरीरांचें सातत्य राहूं शकलें आहे, आणि त्याचें कारण एकजातीय शरीरसंबंध. हें विधान किती हास्यास्पद आहे हें कदाचित् तज्ञाशिवाय कोणाला कळणार नाही, पण म्हणून तें खरें मात्र नाहीं. भेसळ न झालेला एकही गट आज जगाचे पाठीवर नाही. पान ९१ वर त्यानी स्वैराचाराचा पुरस्कार करणारांस लाखोली वाहिली आहे. 'आत्यंतिक अशा घाणेरड्या आणि टाकाऊ कल्पना समाजापुढे मांडण्यास फारसें धैर्य लागत नाही, विद्वत्ता असण्याची गरज नसते.' आणि विवाहसंस्थेचा पुरस्कार करायला मोठें धैर्य लागतें, आणि त्याकरतां हास्यास्पद कारणें द्यायला मोठी विद्वत्ता लागते ! हें धैर्य आणि विद्वत्ता श्री. जोशांशिवाय इतरांत कोठून येणार ? या पुस्तकांत जे विद्वत्तेचे पाझर ठिकठिकाणीं फुटले आहेत, त्यांनी वाचक थक्कच होईल ! पान ९३ वर, जिजाईनें शिवाजीला बापासारखा होण्याचा उपदेश केला, आणि तो दुसऱ्या कोणाचा मुलगा असता तर तिला तसें सांगतां आलें नसतें असें म्हटलें आहे. सामान्य माणसें देखील आपल्या मुलांना मोठ्या माणसांचीं नांवें देत असतात, त्यांतील उद्देश काय हेंहि

यांना माहीत नाही ! आणि पुढच्या वाक्यांत तर ते अगदीच घसरले. शिवाजी दुसऱ्या कोणाचा असता तर 'शिवाजीला समजूं लागतांच त्यानेहि जिजाईचे कर्णाने कुंतीचे जसे वाभाडे काढले तसे वाभाडे काढले असते.' चिडल्यामुळे वाक्यरचनेवरहि परिणाम झाला आहे आणि कर्णाचें उदाहरण देण्यांतला मूर्ख-पणाहि लक्षांत आला नाही. कुंतीला सहा वेगवेगळ्या मांणसांकडून सहा मुलगे झाले. देवांकडून झाले किंवा व्यभिचाराऐवजी ते नियोगाने झाले असें म्हणण्याने वस्तुस्थिति बदलत नाही. हे साही मुलगे इतके पराक्रमी निपजले की पतिव्रता गांधारीच्या शंभर मुलांना त्यांनी जेरीस आणलें. मग व्यभिचाराने मुलें हिणकस होतात असें श्री. जोशी कोणत्या तोंडाने म्हणतात ? व्यभिचारा-पासून तेजस्वी मुलें जन्मल्याचीं ऐतिहासिक उदाहरणेंहि कांही कमी नाहीत. पण श्री. जोशांच्या डोक्यांतली 'रक्ताची सरभेसळ' कशी जाणार ? असल्या अचरट तरफदारीने विवाहसंस्थेला फारसें स्थैर्य लाभेल असें वाटत नाही.

---

## २. इतर पत्रांतील कांहीं प्रश्न

१. रजस्वलेशीं संभोग इष्ट आहे काय ? इतर दिवसांपेक्षा या दिवसांत तो करणें अधिक फायदेशीर काहे काय ? तसा तो फायदेशीर असल्यास विटा-ळाची घाण टाळण्यास उपाय कोणते ? हा समागम फायदेशीर कसा ? २. गर्भिणी स्त्रीशीं संभोग केल्यास गर्भिणीस फायदा आहे काय ? शारीरिक अपाय न होण्याची काळजी घेतल्यास तो फायदा कोणत्या दृष्टीने होतो ? पुरुषास फायदा कितपत व कसा होतो ? ३. गुप्त रोगांपासून बचावाचीं साधनें एक तासाच्या आंत वापरावीं असें आपण लिहिलें आहे, परंतु आपल्या पुस्तकांत शेवटीं जो इलाज ( इंद्रिय जंतुनाशक गरम पाण्यांत बुडवून ठेवण्याचा ) तो मात्र चार तासांचे आंत वापरावा असें लिहिलें आहे, तेव्हा हें कसें ? ४. वरील उपायाने कदाचित् गर्भापासून बचाव होईल, परंतु परम्यापासून कसा होईल ? चार तासांत परम्याचे जंतु मूत्रमार्गांत जाणें शक्य आहे. त्यासाठी मूत्रमार्ग पिचकारीने धुणें जरूर नाही काय ? ५. वरील इलाज करण्यास पाणी साधारण किती

गरम असावें? वरील इलाज वापरून देखील रोगजंतु आसपासच्या भागास लागलेले असल्यास रोग होणार नाही काय? ६. पोटॅशिअम परमँगनेट हें औषध सदैव टिकणारें आहे काय? नसल्यास बाटली उघडल्यापासून तें किती दिवस टिकतें? हें वापरण्याचें प्रमाण १:४००० पेक्षा १:२००० ठेवल्यास अधिक चांगलें नाही काय? ७. निरोगी स्त्रीचा महारोग्याशीं संबंध होऊन नंतर दुसऱ्या निरोगी माणसाशीं संबंध झाल्यास त्याला संसर्ग होणें शक्य आहे काय? ८. कॅन्सरचीं ठळक लक्षणें कोणतीं? ९. स्नानाचे वेळीं साबणाचें पाणी योनिमार्गांत गेल्यानें वरच्या वर्गांतील यूरोपीय स्त्रियांस मुलें कमी होत असावीं अशा अर्थाचा मजकूर आपल्या एका अंकांत आला आहे. यासंबंधी आपलें मत काय आहे? इकडील एक पदवीधर डाक्तर साबणाचें प्रमाण बरेंच असलेल्या पाण्यांत स्पंज बुचकळून तो संततिनियमनार्थ वापरावा असा सल्ला देतात. योनिमार्गांत नेहमीं साबण वापरल्यानें अपाय होणार नाहीं काय? १०. तंबाकूचें विष विवक्षित प्रमाणांत शरीरांत गेल्यास त्यामुळे विषविनाशक नैसर्गिक शक्तीस काम मिळाल्यामुळे ती अधिक कार्यक्षम राहील असें आपणास वाटत नाही काय? त्यामुळे सौम्य व अल्प धूम्रपान आवश्यक ठरतें ना?

उ. १. त्यांत फायदेशीर असें कांहीच नाही. स्त्रीस इच्छा असल्यास तिचें समाधान होईल इतकेंच. स्वच्छतेचे सामान्य उपाय आहेतच. २. याचेंही उत्तर तेंच. पुरुषास फायदा कांहीच नाही. ३. यासंबंधी अनेक डाक्तरांनीं वेगवेगळीं मतें दिलीं आहेत. हे उपाय शक्य तितक्या लवकर करावे. चार तासांनंतर किंवा सहा तासांनंतरही उपयोग होतो असें कांही डाक्तर म्हणतात पण तितका धोका जास्त. ४. मूत्रमार्गांत थोडें जंतुनाशक पाणी जाईलच. ५. पाणी सोसवेल इतकें गरम असावें. आसपासचा भागही जंतुनाशक पाण्यानें धुणें जरूर आहे. ६. बहुतेक सर्व औषधें जुनीं झाल्यास खराब होतात, तरी कांही महिन्यांत तें खराब होणार नाही. कोणत्याही चांगल्या कंपनीचें वापरावें. हें औषध जालीम आहे. त्याची संवय झाल्यावर अधिक प्रमाणांत वापरण्यास हरकत नाही, परंतु प्रथम दिलेलें प्रमाणच घ्यावें

७. कोणताही सांसर्गिक रोग अशा रीतीनें होणें शक्य आहे. प्रतिबंधाकरितां जंतुनाशक पाण्याने सर्व शरीर धुवावें. ८. कॅन्सर म्हणजे एक प्रकारचा व्रण असतो व तो शरीराच्या आंतल्या किंवा बाहेरच्या कोणत्याही भागास होतो. ९. कांही स्त्रियांना गर्भधारणा सहज होते आणि कांहींना महत्प्रयासाने होते. तेव्हा कांही स्त्रियांच्या बाबतींत साबणाचें पाणी गर्भप्रतिबंधास पुरेसें होईल. साबण चांगला असल्यास त्याने नुकसान होणार नाही. १०. अशाच विचारसरणीने भांग, गांजा, चरस, अफु, वगैरे सर्वच प्रकारचीं विषें अत्यंत आवश्यक ठरतील! कोणाला विष खायचें असलें तर आमची मुळीच हरकत नाही, पण तें विष सेवन करतांना इतरांना जो त्रास होतो त्याला आमची हरकत आहे. आपल्या खोलींत बसून कोणंतेंही विष खुशाल घ्यावें. **सं.**

---

# शारदेचें पत्र

सगळ्याच कॉंग्रेसवाल्यांची अक्कल गांधींकडे गहाण टाकली आहे की काय कोण जाणे! गांधी आपल्याला मोठे धार्मिक म्हणवतात आणि त्यांचे शागिर्द आपल्याला देशभक्त म्हणवतात, पण गांधी इंग्रजांच्या प्रेमांत सांपडलेले आहेत आणि शागिर्दांना अक्कल वापरायची परवानगी नाही, आणि हे लोक आतां कायदे करणार! अशी एकेकाची अक्कल पाघळते आहे! आणि पुनः सत्य आणि अहिंसेचें ढोंग आहेच. दारूबंदीचा कायदा पाहिला तर त्यांत सत्यहि नाही आणि अहिंसाहि नाही. कॉंग्रेसला सत्याची खरोखरच चाड असती, तर त्यांनी आपला दारूबंदीचा बेत निवडणुकीपूर्वीच जाहीर करायला पाहिजे होता. पण जाहीर केला असता तर त्यांना बहुमत न मिळण्याची धास्ती होती, म्हणूनच हा बेत त्या वेळीं न सांगतां आतां हळूच पुढें आणला. याला गांधींची फूस आहे हें उघडच आहे आणि ही जबरदस्ती आहे, अहिंसा नाही, हें गांधींना कळत नाही काय?

तसाच लीलावती मुनशीबाईंचा कायदा—नव्हे दोन कायदे. काय म्हणे एक बायको जिवंत असतांना दुसरी करण्याची कायद्याने बंदी करणार! कायद्याने

विवाहविधीला बंदी करतां येईल, पण मनाला, किंवा या बाबतींत शरीरालाहि कायद्याचें बंधन लागू पडत नाही, एवढें सुद्धां त्यांना कळूं नये? समजा मुनशींच्या मनांत दुसरें लग्न करायचें असलें, तर कायदा केल्याचा परिणाम काय होईल हें काय मीं सांगायला पाहिजे? या सर्वांची अक्कल आली आहे विलायतेहून, त्यामुळे विलायतेंत कायदे आहेत तसेच आपल्याला पाहिजेत असें यांना वाटतें. 'टाइम्स् ऑफ इंडिआ' सारख्या पत्राने मोठ्या आढ्यतेने लिहिलें आहे की अशा सुधारणेला लोकमत अजून तयार झालेलें नाही. अर्थात् जें विलायतेंत आहे तीच सुधारणा असें टाइम्सला वाटल्यास तें क्षम्य आहे, पण काँग्रेसवाल्यांना देखील तसेंच वाटावें?

दुसरा कायदा म्हणजे वधूवरांच्या वयांत फार अंतर असूं नये अशी सक्ती करणारा. या बाबतींत तरी सक्ती काय म्हणून? अमुक एका वयापूर्वी लग्न होऊं नये म्हणण्यांत कांहीतरी अर्थ आहे, पण मुलगी वयांत आली, म्हणजे कोणाशीं लग्न करावें हें ठरवण्याचा हक्क तिला असला पाहिजे. वयांत फरक किती असावा याचा विचार समंजस मुली करतातच. अर्थात् मुलीवर कोणाचीही सक्ती होतां नये हें उघड आहे. लीलावती मुनशी या समंजस आहेत अशी माझी कल्पना होती पण ती फोल ठरली. आम्हाला दुसरा नवरा करायला परवानगी नाहीं, तेव्हां पुरुषांना दुसरी बायको करतां येऊं नये म्हणणें ही केवळ सूड घेण्याची बुद्धि आहे आणि त्यांनी आपल्या भाषणांत देखील असेंच सांगितलें की तुम्ही आम्हाला जे कायदे लावतां तेच आम्हीं तुम्हाला लागू केले तर तुमची तक्रार असतां नये. ही शेंपूट तुटलेल्या कोल्ह्यासारखी वृत्ति कां? पुरुष आपल्यापेक्षा उंच असतात, म्हणून त्यांचें डोकें तोडून का त्यांना आपल्या बरोबरीला आणायचे? पुरुषांना जास्त हक्क आहेत, जास्त स्वातंत्र्य आहे, तेव्हा तसे हक्क आणि तितकें स्वातंत्र्य बायकांनी जरूर मागावें. पुरुषांना बायको पसंत नसली म्हणजे दुसरी करतां येते, तेव्हा बायकोला नवरा पसंत नसेल तर तिला दुसरा करतां यावा, असा हक्क मागायचा सोडून भलतेंच कांहीतरी बकूं लागलें तर कोण ऐकेल? बाकी यालाहि कदाचित् गांधींची फूस असेल आणि ती असली तर गांधींचे

शागिर्द ऐकतीलही. हो, स्वतःची अक्कल गहाण टाकल्यावर मग काय ?

तसाच लाला यांचा सोडलग्नाचा कायदा. हा देशमुखांच्या कायद्यापेक्षां पुष्कळच चांगला आहे, पण सोडलग्नाची सवलत स्त्रियांना आणि पुरुषांना सारख्याच कारणांकरतां असावी, हें समान हक्कांचें तत्व त्यांत नाही. हे लोक कांहीं तरी करायचें म्हणून करतात, त्याचा तात्विक विचार करीतच नाहींत. वास्तविक नवराबायकोपैकी कोणाच्याहि एकाच्या मागणीवरून सोडलग्न झालें पाहिजे, पण त्यांत सध्यांच्या स्थितींत धोका आहे. बहुतेक स्त्रियांना आपल्या पायांवर उभें राहतां येत नसल्यामुळे लग्नमुक्त झालेल्या बायकांना पोटगी देणें जरूर आहे आणि कोणाही एकाच्या मागणीनें जर लग्न मोडलें, तर कांही बायका केवळ पोटगी मिळवण्याकरतांच लग्न करून ताबडतोब मोडतील, म्हणजे पोटगी लागू होऊन स्वातंत्र्यहि मिळेल ! या सगळ्या अडचणी कशामुळे उत्पन्न होतात हें कोणी पहातच नाहीं. लग्न हा बायकांचा धंदा झाल्यामुळें बायकांना हा कमीपणा आलेला आहे आणि तो नको असेल तर त्याला एकच उपाय आहे. प्रत्येक स्त्रीला स्वतंत्रपणें पोट भरतां येईल इतकें शिक्षण सक्तीनें दिलें म्हणजे असले कायदे करायची जरूर राहणार नाही. मग नवऱ्याने वाटलें तर दहा बायका कराव्या, मला पसंत नसेल तर मी सोडून जाईन, अशी वृत्ति उत्पन्न होईल.

श्री. लीलावती मुनशी या एकंदरींत फार भयंकर बाई आहेत अशी माझी आतां खात्री झाली. कौन्सिलांत गेलें म्हणजे कांहीतरी उपद्व्याप केले पाहिजेत, या तत्त्वावर त्यांनीं शाळेंत पुस्तकें कोणतीं लावावीं यासंबंधी एक ठराव आणला. पुस्तकांसंबंधी म्हणे पालकांची तक्रार असते की पुस्तकें वारंवार बदलल्याने आमचें नुकसान होतें. पुष्कळ मुलें होण्यापासून जे अनेक फायदे असतात, त्यांतला मुख्य हा असतो की मोठ्या मुलांचे कपडे, जोडे, पुस्तकें वगैरे खालच्या मुलांना उपयोगी पडतात ! आणि मुलें जितकीं जास्त तितका हा उपयोग जास्त होतो. समजा एखाद्याला दहा मुलें असलीं, तर वरच्या आणि खालच्या मुलाच्या शिक्षणांत निदान दहा वर्षांचें अंतर राहणार. तेव्हा या पालकांचें म्हणणें असें की पुस्तकें एकदां कायम केलीं

कीं पुनः नवीन पुस्तकें म्हणून घ्यायला नको. आणि अर्थातच तीं दहाच वर्षे कायम ठेवूनही भागणार नाही, तीं केव्हाही बदललीं तरी कांही पालकांची गैरसोय होणार, तेव्हा पुस्तकें कधीच बदलतां नये. आणि त्यांत आणखीहि एक सोय होईल की काँग्रेसच्याच एखाद्या पित्त्याने लिहिलेलीं पुस्तकें कायम केलीं, म्हणजे काँग्रेसचा दर्जा तितका वाढेल. मी कालेजांत होतें त्या वेळची मला आठवण होते. बरेच विद्यार्थी असे असत की कोणताच विषय धडसा येत नसल्या-मुळे बी. ए. ला ऐच्छिक विषय कोणता घ्यावा याची त्यांना पंचाईत पडत असे. ज्यांना पैशाची विशेष फिकीर नसे, ते पूर्वी कधीहि न पाहिलेला एखादा जीवशास्त्रासारखा विषय घेत असत, पण सर्वांत गंमत म्हणजे पुष्कळ गरीब विद्यार्थी एखाद्या विषयाचीं पुस्तकें कोणाचीं वापरलेलीं फुकट मिळतात की काय याचा अजमास पाहून मग तो विषय नक्की करीत असत. पैसे असोत नसोत, अक्कल असो नसो, प्रत्येकाला कालेजचें शिक्षण हें पाहिजेच, कारण बी. ए. होईपर्यंत दुसरा कसला विचारच करायचा नाही ! जेवणाला पैसे नसले तर भीक मागायची, फीला नसले तर नादारी किंवा भीक मागायची, आणि रडतखडत कसेंतरी एकदां बी. ए. व्हायचें, आणि अशा अनेक अडचणींतून बी. ए. झाल्याबद्दल लोकांनी तारीफ करायची, असें नेहमीं होतें. ज्याच्याजवळ पैशाचेंहि भांडवल नाहीं आणि अकलेचेंहि नाहीं, त्यांनी बी. ए. व्हायचें कशाकरतां ? जुन्या लोकांना जसें काशीला गेलें म्हणजे पुण्य लागतें, तसेंच इंग्रजी शिक्षण सुरू झाल्यावर बी. ए. झाल्याने लागूं लागलें. आणि मग सुशिक्षितांच्या बेका-रीबद्दल ओरड करायची ! या तक्रार करणाऱ्या पालकांचीहि हीच स्थिति आहे. शाळेचीं पुस्तकें घेण्याइतकेहि ज्यांच्याजवळ पैसे नाहीत त्यांना जर फुकट शिक्षणाची सोय नसेल तर त्यांनी लिहायला वाचायला शिकल्यावर आणखी शिक्ष-णाच्या भानगडींत पडूं नये. सर्वांचीच फुकट शिक्षणाची सोय झाली पाहिजे हें मला कबूल आहे, पण ती जर करायची असेल तर मुलांची संख्या बेतांत ठेवण्याचीहि सक्ती केली पाहिजे, कारण एरवीं खंडीभर मुलांना शिक्षण देण्याचा बोजा समाजानें कां सोसावा ? आणि या शिक्षण घेतलेल्या लोकांनी पुढे करायचें काय ?

तुझी **शारदा.**